श्री. संतोष रामदास शितोळे, कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र निघोज ता. पारनेर, हे कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत..

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र. साप्रवि/आस्था-३/५५८६०१/८२५/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेनुसार

वाचा:- १. इकडील दोषारोपपत्र क्र.साप्रवि-१/आस्था-३/३३२२/६०/२०२५ दिनांक २२/०१/२०२५
२. श्री संतोष रामदास शितोळे, यांना दोषारोप बजावलेची पोहोच दिनांक २६/०३/२०२५
३. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र निघोज ता पारनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था/४१/२०२५ दिनांक ०२/०५/२०२५
४. इकडील चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी नेमणुक आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५५८६०१/५२५/२०२५ दिनांक २३/०६/२०२५
५. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र. विशा.४/खाचौ/सी.आर.८०/२०२५ दिनांक २८/०४/२०२६ प्राप्त दिनांक २५/०५/२०२६
६. इकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/५५८६०१/४७८/२०२६ दिनांक ११/०६/२०२६
७. श्री संतोष रामदास शितोळे यांना दोषारोप बजावलेची पोहोच दिनांक १५/०६/२०२६
८. श्री संतोष रामदास शितोळे, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक २२/०६/२०२६
९. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र निघोज ता. पारनेर यांचेकडील अहवाल जा.क्र.आरोग्य/वशि/८९/२०२६ दिनांक ०६/०७/२०२६
१०. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (६)

ज्याअर्थी, श्री संतोष रामदास शितोळे, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र निघोज ता.पारनेर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असणे, तसेच कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा करणे इत्यादी गैरवर्तन केलेने संदर्भ क्र. १ नुसार श्री शितोळे यांना दोषारोपपत्र बजावणेत येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. सदर दोषारोप पत्राचा शितोळे यांनी खुलासा सादर न केलेने संदर्भ क्र.४ नुसार, त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी तसेच सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेत आली. संदर्भ क्र. ५ चे सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर चौकशी अहवालात श्री शितोळे यांचे विरुध्द ठेवणेत आलेले ४ आरोप सिध्द होत असलेचे निष्कर्ष प्राप्त झाले.

सदरचे चौकशी अहवालानुसार श्री शितोळे यांना संदर्भ क्रमांक ६ नुसार अंतिम कारणे दाखवा नोटीस देणेत आली. सदरची नोटीस संदर्भ क्रमांक ७ नुसार श्री शितोळे यांना बजावलेची पोहोच कार्यालयास प्राप्त झाली. संदर्भ क्रमांक ८ नुसार श्री शितोळे यांनी खुलासा सादर केला. श्री शितोळे यांच्या खुलाशाचे अवलोकन केले असता श्री शितोळे यांचा खुलासा समाधनकारक नसलेचे दिसुन आले. संदर्भ क्रमांक ९ नुसार वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र निघोज ता पारनेर यांनी अहवाल सादर करुन श्री शितोळे हे पुन:श्च कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असुन त्यांच्या वर्तनात कुठल्याच प्रकारे सुधारणा झालेचे दिसुन येत नसलेचे कळविलेले आहे.

त्याअर्थी श्री. संतोष रामदास शितोळे, कनिष्ठ सहाय्यक, यांचेवर ठेवणेत आलेले आरोप, विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष, तसेच श्री. शितोळे यांनी सादर केलेला खुलासा पहाता सदर प्रकरणी श्री. संतोष रामदास शितोळे, यांनी कार्यालयीन कामी हलगर्जीपणा व गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने श्री शितोळे हे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत आहे असे या प्राधिकरणाचे मत झालेले आहे. सबब श्री शितोळे यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेने त्यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (६) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन काढुन टाकणे मात्र ही घटना भावी नोकरीसाठी अपात्रता ठरणार नाही" ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंदी श्री. संतोष रामदास शितोळे, कनिष्ठ सहाय्यक, यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक .............20261018040185............. असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-10-2026 15:00:18
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. संतोष रामदास शितोळे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र निघोज ता पारनेर

द्वारा व प्रत :- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र निघोज ता पारनेर

२/- सदरचा आदेश श्री. संतोष रामदास शितोळे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र निघोज ता पारनेर यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
प्रत:- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती पारनेर
प्रत:- निवड नस्ती

स्वाक्षरीत/--
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर